
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 6 | JULY - 2022

# एकोणिसाव्या शतकातील स्त्री शिक्षण : महात्मा जोतीराव फुलेंचे योगदान

**डॉ. एकनाथ द. वाजगे.**
सहायक प्राध्यापक, श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर, पुणे.

## प्रास्ताविक



महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या या ओळखीमागे समाजसुधारणा चळवळीचा मोठा इतिहास आहे. समाजाच्या विविध प्रश्नांबाबत नेहमीच राज्याने सकारात्मक विचार केलेला आहे. अलिकडील काळात कोल्हापूर जिल्हयातील हेरवाड ग्रामपंचायतीने विधवा प्रथेस मूठमाती देण्याचा ठराव ग्रामपंचायतमध्ये पारित करुन वैधव्यानंतर स्त्रियांना पाळाव्या लागणाऱ्या औपचारिकता बंद केल्या आहेत. त्याचेच अनुकरण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी होताना दिसून येत आहे. महाराष्ट्रात एकोनिसाव्या आणि विसाव्या शतकात समाजसुधारणेची जी चळवळ उभी राहीली त्याचेच हे फलित आहे. महाराष्ट्रामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, धोंडो केशव कर्वे महर्षी वि.रा. शिंदे, राजर्षी शाहू महाराज, न्यायमूर्ती रानडे, पंडीता रमाबाई, कर्मवीर भाऊराव पाटील, अनुताई वाघ , लोकहितवादी, यासारख्या अनेक समाजसुधारकांनी सामाजिक सुधारणांच्या चळवळीमध्ये स्त्री प्रश्नास महत्व दिले. ब्रिटीश राजवटीमध्ये पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या समाजसुधारकांनी समाजाच्या सुधारणेमध्ये महिलाविषयक प्रश्नाला अग्रगण्य ठेऊन त्या सोडविण्यासाठी स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले.

## महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची पार्श्वभूमी :—

उच्चभ्रू वर्गातील स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून त्या दिशेने वाटचाल करणाऱ्या व्यक्ती तसेच संस्था १८ व्या व १९ व्या शतकात पुढे आलेल्या दिसून येतात. मात्र मध्यम, कनिष्ठ व अस्पृश्य वर्गातील स्त्रीयांना शिक्षण प्रवाहात आणण्याचे महत्वाचे कार्य महाराष्ट्रात जर कोणी केले असेल तर ते महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाईनी. स्त्री शूद्रातिशूद्रांची मुक्ती शिक्षणातूनच होऊ शकेल याची फुले दांपत्याला खात्री होती. १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा स्थापन करून त्यांनी शिक्षणाची दारे महिलांसाठी खुली केली. आधुनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य देखिल महत्वाचे आहे. धोंडो केशव कर्वे यांनी नथुबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठाची अर्थात एस.एन.डी. टी. विद्यापीठाची स्थापना खास महिलांसाठीच केली. १८९६ मध्ये त्यांनी अनाथ बालिकाश्रम मंडळीची स्थापना करून स्त्री शिक्षणाचे कार्य पुढे चालविले. १८८४ मध्ये न्या. रानडे, भांडारकर या समाजसुधारकांनी पुण्यात मुलींसाठी हायस्कूलची स्थापना केली. आगरकरांनी याच कालखंडात मुलींना फक्त लिहिता वाचता येणे तेरीज — बेरीज येणे एवढेच न शिकवता मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रीकच्या परिक्षेला आवश्यक आहेत ते सर्व विषय शिकवावेत असे जोरदार प्रतिपादन केले. प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी संपूर्णपणे सरकारने उचलावी व ते सक्तीचे करावे या गोष्टींचा प्रचार होत असताना आगरकर मुलींच्या शिक्षणाबाबतही सक्ती केली पाहिजे, किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिकच केली पाहिजे असे म्हणत होते. या थोर

विचारवंतांबरोबर मुक्ता साळवे, ताराबाई मोडक, पंडीता रमाबाई यांचे कार्यदेखिल महिलांच्या शिक्षणासाठी अनन्यसाधारण आहे. पंडीता रमाबाई यांनी १८८९ मध्ये विधवा व कुमारिकांसाठी शारदा सदन ही शाळा सुरू केली.

## महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले :

सामाजिक क्रांतीचे जनक, महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे आणि पददलित जनतेचे उद्धारकर्ते म्हणून महात्मा फुले यांचे नेहमीच स्मरण केले जाते. ते एकोणिसाव्या शतकातील जेष्ठ आणि श्रेष्ठ विचारवंत होते. थॉमस पेन आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या विचारांचा त्यांच्यावर पगडा होता. स्त्रीयांच्या उद्धारासाठी स्त्री शिक्षणाचा प्रारंभ करणारे ते पहिले भारतीय होत.

## महात्मा फुलेंचे शैक्षणिक तत्वज्ञान आणि कार्य

महात्मा फुलेंचे महिला शिक्षणविषयक विचार हे त्यांनी हंटर आयोगासमोर दिलेल्या साक्षीतून अधोरेखित होतात. 'सरकार असे सुखस्वप्न बाळगत आहे की हे वरिष्ठ वर्गातील लोक कनिष्ठ वर्गातील लोकांमध्ये शिक्षण प्रसार करतील. हे सुखस्वप्न उराशी बाळगून गरीब शेतकऱ्यांकडून सरकार जो शेतसारा गोळा करते त्या सर्व वसुलाचे उत्पन्न सरकार वरिष्ठ लोकांच्या शिक्षणावर उधळते' हे मत त्यांनी मांडले त्याचबरोबर सरकारी वरिष्ठ वर्गाच्या जागा उच्च वर्णियांची मक्तेदारी झाली असल्याचे मतही त्यांनी मांडले. शिक्षण हे सर्वांसाठी असावे. इश्वरानेच सर्व मानव निर्माण केल्यामुळे तो सर्वांना सारखेच अधिकार देईल. त्यांच्यात भेदाभेद करणार नाही. या सिद्धांतानुसार शिक्षण घेण्याचा अधिकार समाजातील सर्वांनाच आहे. कोणत्याही जातीत व्यक्ती जन्मास येवो, स्त्री असो अथवा पुरुष सर्वांनाच शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षण हे मानवतावादी मूल्य विकसित करणारे असावे. शिक्षणातून केवळ कारकून निर्माण न करता माणसा माणसातील सामाजिक दरी दूर होणे गरजेचे आहे. त्यासाठी मानवतावादी मूल्यांची शिकवण शिक्षणातून मिळणे आवश्यक आहे. सध्याची शिक्षण पद्धती सर्वांना समावून घेणारी नाही. जातीधर्माच्या आधारावर श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा संकल्पना निर्माण झाल्या आहेत. यामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणास कोठेही वाव असल्याचे दिसून येत नाही. म्हणून शिक्षणामध्ये सामाजिक न्यायाचे तत्व हे पाळले गेले पाहिजे. शिक्षण हे दैन्यावस्था मिटविण्यासाठी आवश्यक आहे. अनेक शतकांपासून अस्पृश्य व दिन दलित जनतेला ज्ञानार्जनाची दारे बंद झाली. परिणामी या वर्गाची सामाजिक , आर्थिक व अन्य क्षेत्रात अवनती होऊन हालाकीचे जीवन वाटयाला आले. दैन्यावस्था मिटवायची असेल तर दलित आणि महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे. खेडयातील बहुतांश लोक शेतीचा व्यवसाय करतात. त्यासाठी ग्रामिण भागातील शिक्षणाचे स्वरुप , अभ्यासक्रम हा शेतीच्या कामाशी निगडित असणे गरजेचे आहे. शिक्षण हे ज्ञानप्राप्ती करणारे, सामाजिक जागृती याचबरोबर उपजिविकाप्रधान असावे. पारंपारिक शिक्षणापेक्षा आणि नव्याने दिल्या जाणाऱ्या कारकूनी शिक्षणापेक्षा शिक्षण हे व्यावसायिक कौशल्य निर्माण करण्यासाठी असावे. माध्यमिक शिक्षण हे कौशल्यप्रधान असावे. शिक्षणातून विविध जीवनोपयोगी मूल्ये विकसित व्हावीत. मुलांमध्ये श्रमप्रमिष्ठा निर्माण व्हावी. समानता , बंधुभाव या मूल्यांचा विकास शिक्षणातून होण्यास मदत होईल.

## जोतीरावांचे महिला शिक्षण विषयक कार्य :—

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की त्या काळात स्त्रीयांनी वहाना वापरणे अपवित्र मानले जाई . स्त्रीने छत्री वापरली तर पुरुषाचा उपमर्द होतो असे मानले जात असे. सावित्रीबाईंचे पहिले चरित्र लिहिणाऱ्या शांताबाई बनकर यांनी सून हा शब्दच गुलामगिरीचा वाचक आहे असे म्हटले आहे. मुळातच परंपरेने स्त्री ही अविश्वासास अपात्र , दुष्ट, अविचारी, स्त्रैन , असे मानले जाई. मुलीने शिक्षण घेतले तर तीला अकाली वैधव्य येते. तीने पायात जोडे घालू नये. समाजामध्ये ती एक परतंत्र अबला म्हणूनच गणली गेली. विद्याभ्यासाने तिची पापाचरणाकडे प्रवृत्ती होईल. तिच्या बुद्धिने वागले असता सर्वत्र नाश होतो. मुलगी शिकली तर ती सासऱ्याची पर्वा करणार नाही. विद्यादिकेकरुन कपट , कुयुक्ती, वंचना मात्र वाढेल अशी समजूत या काळात होती. धर्म आणि सामाजिक परंपरा यांनी तिचे जीवन जखडून ठेवले होते. जोतीरावांनी स्त्री

शिक्षणाकडे समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून पाहिले. परंपरावादी सनातन्यांच्या विरोधी जात महाराष्ट्रात स्त्रीयांना शिक्षणाची दारे सर्वप्रथम उघडून दिली ती जोतीरावांनीच. जोतीरावांना हे माहीत होते की स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलांचे शिक्षण. आपण जर एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे. परंतु एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे. देशाचे हित साधायचे असेल तर ते स्त्री शिक्षणाशिवाय साधणार नाही. हा विचार जोतीरावांच्या मनात बिंबला. या विचारांतूनच इ. स. १९४८ मध्ये त्यांनी पुण्यातील भिडेवाडयात मुलींसाठी पहिली शाळा स्थापन केली. या शाळेत दलित विद्यार्थ्यांनाही त्यांनी प्रवेश दिला. या शाळेत वाचन , अंकगणित, आणि व्याकरणाची मूलतत्वे हे विषय शिकविले जात असे. यशवंत परांजपे, सदाशिव गोविंद हाटे, सदाशिवराव गोवंडे यांनी त्यांना शाळा चालविण्यासाठी आर्थिक मदत केली. शुद्रातिशूद्रांना खरा धर्म कळावा , न्याय अन्याय समजावा. न्याय अन्याय यांची जाणीव व्हावी, आपले हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव व्हावी हे स्त्री शिक्षणाचे उद्दिष्ट होते. यानंतर त्यांनी पुणे आणि परिसरात एकूण अठरा शाळा सुरू केल्या. यामध्ये पुणे येथिल अस्पृष्यांसाठीची शाळा, हडपसर, ओतूर , सासवड, कसबा पेठ, नायगाव, शिरवळ, तळेगाव ढमढेरे , शिरूर, अंजीरवाडी (माझगाव), करंजे जि. सातारा, भिंगार जि. सातारा, मुंढवा, आप्पासाहेब चिपळूणकर वाडा पुणे, नानापेठ पुणे, रास्ता पेठ पुणे, वेताळ पेठ पुणे या अठरा ठिकाणी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी शाळा सुरू करुन बहुजनांच्या शिक्षणाची चळवळच हाती घेतली. मात्र यासाठी अपार कष्ठ घेत असतानाच अनेक समस्याही निर्माण झाल्या. परंपरेने ग्रासलेल्या समाजामध्ये स्त्रीयांचे कुटुंबाच्या बाहेर पाऊल टाकणे जेथे अमान्य ठरवले गेले तेथे तिने शिक्षणासाठी टाकलेले पाऊल साहजिकच तत्कालिन समाजाच्या दृष्टीने पापच असणार होते. त्यातूनच अनेक समस्या महात्मा फुलेंसमोर उभ्या ठाकल्या. मुलींना शिकविण्यासाठी पुरुष शिक्षकास असलेला विरोध लक्षात घेऊन फुलेंनी सावित्रीबाईंना प्रथम शिक्षण देवून त्यांना शिक्षेकीचे जबाबदारी दिली. त्यासाठी सावित्रीबाईंनी १८४७ मध्ये नॉर्मल स्कूल मधून शिक्षकाचे प्रशिक्षण घेतले. शूद्रातिशुद्रांना व स्त्री वर्गाला शिक्षण मिळावे म्हणून घरच्यांचा विरोध पत्करून सावित्रीबाईंनी जोतीरावांबरोबर गृहत्याग केला. सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या साथीने १८५३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. महात्मा जोतीराव फुलेंच्या स्त्री शिक्षणविषयक कार्यामध्ये सावित्रीबाई फुलेंचे योगदान महत्वाचे आहे. 'न स्त्री स्वातंत्रमर्हति' असे मनूने सांगून स्त्रीच्या पारतंत्र्यावर जे कायमचे जोखड लादले होते त्याला छेद देण्यासाठी पुरोगामी विचारांची , स्वावलंबी व जागृत स्त्री उभी करण्याचे काम सावित्रीबाईंनी केले. सावित्रीबाईंचे कार्य हे स्त्रियांच्या जीवनातील युगप्रवर्तक कार्य मानावे लागेल. भारतातील पहिली शिक्षिका , पहिली मुख्याध्यापिका व आद्य समाजसेविका म्हणून सावित्रीबाईंचे कार्य महत्वाचे आहे. महत्मा फुलेंच्या साथीने स्त्री व शूद्रातिशूद्रांचा दुखमुक्तीचा संग्राम महात्मा फुले यांच्याबरोबर धैर्याने व मोठया जिद्दीने यशस्वी केला. सतिप्रथा, विषमविवाह, केशवपन, बालविवाह यासारख्या अनिष्ठ प्रथांना विरोध करण्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता. मूलताच सुधारकी विचार असणाऱ्या सावित्रीबाईंनी अनिष्ट रूढी परंपरांवर मात करत स्वतंत्रता, समानता व बंधुता या मूल्यांची जोपासना त्यांनी केली. स्त्री मुक्ती आणि त्यासाठी स्त्री शिक्षणामध्ये त्यांचे कार्य लाख मोलाचे आहे. म्हणूनच स्त्री मुक्तीच्या त्या आद्य प्रवर्तक ठरतात.

महात्मा जोतीराव फुले यांचे एकोणिसाव्या शतकामध्ये सुधारणावादाची जी चळवळ उभी राहिली त्यामध्ये स्त्री उद्धाराच्या दृष्टीने महत्वाचे आहे. सामाजिक परिवर्तनात शिक्षणाचे महत्व जाणलेल्या महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणाची चळवळ उभी करून सामाजिक क्रांती घडवून आणली.

## संदर्भ

१. नरके ह. (२०१८) **महात्मा फुले गौरव ग्रंथ,** मुंबई महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती,
२. भगत , रा. तु. (२००५) **शिक्षणातील थोर विचारवंत,** कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन
३. बनकर शां. र. (२०२१) **समाजभूषन कै. सौ. सावित्रीबाई फुले यांचे अल्पचरित्र,** पुणे : विद्यापीठ मुद्रनालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
४. गंधारे द. के. (२०१३) महात्मा फुले यांचा शिक्षणविचार, पुणे : पद्मगंधा प्रकाशन.
५. कीर , धनंजय (१९९०) जोतीराव फुले — आमच्या समाजक्रांतीचे जनक , मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.

६. नरके, हरी (२००६) महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, मुंबई.
७. देहाडराय, स्वा. तांबे अ. (२००९). **स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण**, पुणे: क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ.
८. भागवत, वि. (२००४) **स्त्री प्रश्नाची वाटचाल**. पुणे: प्रतिमा प्रकाशन.